स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३.२३०९७१० E.Mail - pilcbnskr@gmail.com

---

## प्रेसनोट

दिनांक:- ११/०४/२०१८

**नातवानेच केला आजोबाचा खुन - स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने केले आरोपीस जेरबंद**

---

दिनांक ०५ एप्रिल २०१८ रोजी चांदवड तालुक्यातील खडकओझर शिवारात केद्राई माता मंदिराजवळ इसम नामे बबन महादु जाधव, वय ६०, रा. खडकओझर हे त्यांचे झोपडीजवळ बसलेले असतांना त्यांचा नातु नामे अंकुश सोमनाथ बर्डे रा. कुंदेवाडी, ता.निफाड याने त्यांचेकडे पैशांची मागणी केली असता, त्यांनी नकार दिल्याने आरोपी अंकुश बर्डे याने त्याचे आजोबांच्या डोक्यात व तोंडावर टोकराने व दगडाने मारून गंभीर जखमी करून जिवे ठार मारले होते. सदर बाबत **वडनेर भैरव पोलीस ठाण्यात I गुन्हा रजि.नं. २५/२०१८ भादवि कलम ३०२** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयातील आरोपी नामे अंकुश बर्डे हा गुन्हा घडल्यापासुन अज्ञातस्थळी फरार झालेला होता.

सदर घटनेबाबत नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. हर्ष पोद्दार सो.** यांनी तात्काळ दखल घेवुन सदर गुन्हयातील आरोपीस अटक करणेबाबत सुचना दिल्या होत्या. त्यानुसार **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी सदर गुन्हयातील आरोपीचे सध्याचे वास्तव्याबाबत गोपनीय माहिती घेवुन स्थागुशाचे पथक मालेगाव व येवला तालुक्यात रवाना केले. दिनांक १० एप्रिल २०१८ रोजी स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी सदर आरोपीचे शोधार्थ तपास करीत असतांना पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीप्रमाणे सदर गुन्हयातील आरोपी हा येवला तालुक्यात असल्याचे समजलेवरून स्थागुशाचे पथकाने त्यास सातारे, ता.येवला परिसरात सापळा रचुन ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेला **आरोपी नामे अंकुश सोमनाथ बर्डे, वय २२, रा. कुंदेवाडी, ता.निफाड** यास विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्याने त्याचे आजोबांचा खुन केल्याची कबुली दिली आहे.

आरोपी अंकुश बर्डे याने दि. ०५ एप्रिल २०१८ रोजी सायंकाळचे सुमारास त्याचे मयत आजोबा नामे बबन जाधव यांचेकडे खर्चासाठी पैशांची मागणी केली असता, त्यांनी पैसे दिले नाही व त्यास तु येथुन निघुन जा, आमचे घरात राहु नकोस या कारणावरून राग मनात धरून आरोपीने मयताचे डोक्यात व तोंडावर टोकराने जबर मारहाण करून गंभीर जखमी करून डोक्यात दगड टाकुन जिवे ठार मारले असल्याची कबुली दिली आहे. सदर आरोपीस वरील गुन्हयाचे तपासकामी वडनेर भैरव पोलीस ठाणेस हजर करण्यात आले आहे.

सदर गुन्हयात **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे**, सहा.पोलीस निरीक्षक श्री.**राम कर्पे,** सपोउनि अरूण पगारे, पोहवा संजय गोसावी, पोकॉ सुशांत मरकड, मंगेश गोसावी, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम अशांचे पथकाने सदर खुनाचे गुन्हयातील आरोपीस ताब्यात घेवुन गुन्हा उघडकीस आणलेला आहे.